# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ / चैत्र ४, १९४८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल मंत्री** | |
| **(२)** | **वने मंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(७)** | **मदत व पुनर्वसन मंत्री** | |
| **(८)** | **मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २३**

---

### पळसगाव (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील अंकुर कंपनीचे गव्हाचे बियाणे निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१) * ३१९२९ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळसगाव (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात अधिक उत्पादनाच्या आशेने कोठारी येथील एका कृषी केंद्रातून अंकुर कंपनीचे 'केदार' वाणाचे गव्हाचे बियाणे खरेदी केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीकडून बियाण्यांच्या उच्च गुणवत्तेची व अधिक उत्पादनाची हमी देण्यात आली होती मात्र प्रत्यक्षात पीक ओंब्यांवर (लोंब्यांवर) आल्यावर शेतातील गव्हाची वाढ असमान असल्याचे दिसून आले आणि बियाण्यात भेसळ असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाली असून, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या संबंधित 'अंकुर कंपनीवर आणि निकृष्ट दर्जाचे बियाणे विकणाऱ्या कृषी केंद्र चालकावर कारवाई करण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करुन त्यांना योग्य ती नुकसानभरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) दिनांक ९ फेब्रुवारी, २०२६ रोजी प्राप्त शेतकऱ्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर शेतकऱ्याचे शेतात तालुका तक्रार निवारण समिती मार्फत दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी शेतकऱ्याने दिलेल्या माहितीवरून व प्रत्यक्ष पिक परिस्थिती आधारे पंचनामा करण्यात आला. सदर पाहणी केली असता नगण्य स्वरुपात रोपाच्या उंचीत तफावत दिसुन आली असून पिकाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे कंपनी तथा कृषि केंद्रावर कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे धुकटण (ता. जि. पालघर) येथे जी. आर. इन्फ्रा. लिमिटेड या कंपनीद्वारे रसायनमिश्रीत मातीचा भराव केल्याबाबत**

**(२) * ३१५२३ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धुकटण (ता.जि.पालघर) येथील सर्व्हे क्र. २०० व लगतच्या ३५ एकर क्षेत्रावर मुंबई–बडोदरा गतिमान मार्ग प्रकल्पांतर्गत जीआर इन्फ्रा लि. मार्फत रसायनमिश्रीत मातीचा भराव करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी टाकण्यात आलेल्या भरावातील माती रसायनमिश्रीत असल्याबाबत ग्रामस्थांकडून तक्रारी प्राप्त झाल्या असल्याने संबंधित माती व पाण्याचे नमुने तपासणीकरीता घेण्यात आले आहेत तसेच यासंदर्भातील तपासणी अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर भराव क्षेत्रातून पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी शेती तसेच सूर्या नदीत मिसळून जलप्रदूषण होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे संभाव्य नुकसान लक्षात घेता पंचनामे करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंपनीवर कारवाई करण्यासह शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) मौजे धुकटण, ता. जि. पालघर येथील सर्व्हे नं. २०० व लगतचे अंदाजे ३५ एकर क्षेत्रामध्ये मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गाच्या पार्किंगसाठी जी.आर. इंफ्रा.प्रा.लि. या कंपनीकडून भरावाचे काम चालू आहे.

उपसरपंच ग्रामपंचायत, धुकटण यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६ रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर भरावाची पाहणी केली असता सदर भरावात माती व मुरुम बरोबरच काही प्रमाणात बिल्डींगच्या डेब्रीजचा वापर करण्यात आला आहे. तथापि, सदर जागेत रसायन मिश्रीत मातीचा भराव केल्याचे प्रथम दर्शनी आढळून आले नाही.

सदर जागेतील भरावामध्ये वापरलेल्या माती /मुरूम /डेब्रीजचे नमुने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, तारापूर यांनी तपासणीसाठी गोळा केले असून ते पृथःकरणासाठी प्रयोगशाळेत दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी पाठविण्यात आले आहे.

प्रयोगशाळेकडून माती परिक्षणाचे पृथःकरण अहवाल प्राप्त झाल्यांनतर सदर भराव रसायनमिश्रीत असल्याचे आढळून आल्यास प्रकरणी शासन नियमानुसार पुढील प्रतिबंधात्मक कार्यवाही तात्काळ करण्यात येऊन संबंधितांवर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत प्रचलित नियमानुसार पुढील कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील भीमाशंकर अभयारण्याला राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा देण्याबाबत

**(३) * ३१९५५ श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भीमाशंकर अभयारण्य हे जैवविविधतेने समृद्ध असून त्याला राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अभयारण्याला राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित केल्यास त्याचा पर्यावरणावर आणि स्थानिक समुदायावर कोणता परिणाम होणार आहे या संदर्भात अभ्यास करुन समिती गठित करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अभयारण्याला राष्ट्रीय उद्यान घोषित करण्यासाठी राज्य शासनाकडून प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२) व (३) महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक १६ सप्टेंबर, १९८५ अन्वये भिमाशंकर अभयारण्य घोषित करण्यात आलेले असून, भिमाशंकर अभयारण्याचे एकूण क्षेत्रफळ १३०.७८ चौ.कि.मी. इतके आहे. तथापि, सद्य:स्थितीत भिमाशंकर अभयारण्याला राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा देण्यात आलेला नसून असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पासाठी चिमूर येथे स्वतंत्र ट्रान्झिट कॅम्प निर्माण करण्याबाबत

**(४) * २९७५७ श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील शहर व ग्रामीण भागात मानव वन्यजीव संघर्षामुळे जीवित व वित्तहानी होत असून शेत पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने या प्रकरणी उपाययोजना करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये शासनाशी पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्याचे विशेषत: ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पामुळे भौगोलिकदृष्ट्या विभाजन झाले असून चिमूर हे ठिकाण जिल्हा मुख्यालयापासून साधारण ११० ते १५० किमी अंतरावर असून सध्याचा मुख्य ट्रान्झिट कॅम्प नागपूर येथे असून तो चिमूर, ब्रह्मपुरी, घोडाझरी आणि कराण्डला (उमरेड) या भागांपासून सुमारे १५० किमी अंतरावर असल्याने चिमूर येथे स्वतंत्र ट्रान्झिट कॅम्प निर्माण करण्याची मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पासाठी चिमूर येथे स्वतंत्र ट्रान्झिट कॅम्प उभारल्यास वन्य प्राण्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या जखमींना तात्काळ उपाययोजना, औषधोपचार मिळण्याची व्यवस्था होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त जिल्ह्यात विशेषत: ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पासाठी चिमूर येथे स्वतंत्र ट्रान्झिट कॅम्प निर्माण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) अशा प्रकारची निवेदने प्राप्त झाली आहेत. ही वस्तुस्थिती आहे.
(२), (३) व (४) चिमूर येथे स्वतंत्र ट्रान्झिट कॅम्प निर्माण करण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे.

तथापि, चिमूर वनपरिक्षेत्रामध्ये वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमींना उपचाराकरिता उप जिल्हा रुग्णालय, चिमूर व गरज भासल्यास चंद्रपूर किंवा नागपूर येथील रुग्णालयात हलविण्यात येते.

सदर परिसरात ट्रान्झिट कॅम्प निर्माण करण्याच्या अनुषंगाने सर्व तांत्रिक बाबी व नियम तपासून आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्याची तजवीज शासन स्तरावर ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात दोन वेगवेगळ्या गावांमध्ये जमिनी असलेल्या शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनांचा लाभ मिळण्याबाबत**

**(५) * ३१०६९ श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ज्या ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात लाभार्थी राहतात त्याच ग्रामपंचायतीत जॉबकार्ड असणे अनिवार्य आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतीवर आधारित वैयक्तिक लाभाच्या कामांसाठी (उदा. सिंचन विहीर, फळबाग लागवड, शेततळे) लाभार्थी त्या ग्रामपंचायतीचा रहिवासी असणे आणि तेथेच त्याचे जॉबकार्ड असणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी दोन वेगवेगळया गावांमध्ये असल्यामुळे त्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनांचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील ज्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी दोन वेगवेगळया गावांमध्ये आहेत अशा शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) ज्या ग्रामपंचायतीमार्फत लाभार्थ्यास जॉबकार्ड प्राप्त झाले आहे अशा ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्राबाहेरील शेतीवर देखील मनरेगा अंतर्गत वैयक्तिक लाभ दिला जातो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात 'विकसित भारत जी राम जी' योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेचा सुधारित आकृतीबंध तयार करण्याबाबत

**(६) * ३२०३४ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात 'मनरेगा' (MGNREGA) योजना पूर्णतः बंद करून त्याऐवजी 'विकसित भारत जी राम जी' ही नवीन योजना सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनरेगा अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी व कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांचे (उदा. तांत्रिक सहाय्यक, संगणक परिचालक, ग्राम रोजगार सेवक इ.) नवीन योजनेत समायोजन करण्याबाबत निर्माण झालेल्या प्रश्नामुळे कर्मचारी वर्गात असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने माहिती घेवून नवीन योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेचा सुधारित आकृतीबंध (Revised Staffing Pattern) तयार करून, उक्त कर्मचाऱ्यांच्या नोकरीच्या सुरक्षेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) होय, केंद्र शासनाने 'मनरेगा' (MGNREGA) ऐवजी 'विकसित भारत जी राम जी' हा कायदा संसदेत दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) विकसित भारत जी राम जी (VB G RAM G) या कायद्याच्या आकृतीबंधाबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## उगाव (जि.नाशिक) येथील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्याने कर्जबाजारीपणामुळे केलेली आत्महत्या

**(७) * २७९८२ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उगाव (जि.नाशिक) येथे द्राक्ष उत्पादक शेतकरी श्री. कैलास पानगव्हाणे यांनी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे द्राक्षबागांचे नुकसान, वाढता उत्पादन खर्च आणि शेतमालाला योग्य भाव न मिळणे यामुळे आत्महत्या केली असल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे गत काही वर्षांपासून द्राक्ष बागांचे नुकसान होत असून यंदाच्या हंगामात नाशिक जिल्ह्यातील ७०% द्राक्ष बागांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत मध्यम मुदतीचे पीककर्ज माफ करावे व पुढील वर्षासाठी बिनव्याजी पीककर्ज देण्यात यावे तसेच १००% नुकसानीचे पंचनामे करून ५०% सबसिडीने क्रॉप कव्हर देण्यात यावा अशी मागणी द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांकडून शासनाकडे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१), (२), (३) व (४) कै. कैलास यादव पानगव्हाणे रा. उगाव ता. निफाड यांनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०२५ रोजी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली आहे. कै. कैलास यादव पानगव्हाणे यांचे नावे गट नंबर २९२/२ क्षेत्र ०.४० हे तसेच सामाईक क्षेत्र गट क्र २९४/२ वर ०.२ हे एवढे क्षेत्र आहे पैकी ०.४ हे क्षेत्रावर द्राक्ष बाग लागवड केलेली आहे. खरीप २०२५ मध्ये मे महिन्यापासूनच्या सततचा पाऊस व अतिवृष्टी मुळे माहे सप्टेंबर मध्ये २०२५ मधील द्राक्ष पिकाचे नुकसान झाले आहे. कै. कैलास यादव पानगव्हाणे यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले असून त्यांना दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ रोजी आयोजीत जिल्हास्तरीय समिती बैठकीत पात्र ठरविलेले असून रु. १ लक्ष अनुदान मंजूर केलेले आहे.

सन-२०२५-२६ मध्ये नाशिक जिल्ह्यात द्राक्ष पिकाखालील ५६६८१.२४ हे. क्षेत्र असून त्यापैकी नैसर्गिक आपत्तीमुळे ४२६४२ हे. क्षेत्र बाधित झाले असून लागवडीच्या क्षेत्राशी बाधित क्षेत्राचे प्रमाण ७५ टक्के इतके आहे.

राज्यातील शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांची शिफारस शासनास करण्यासाठी सहकार व पणन विभागाच्या दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या शिफारशी विचारात घेऊन राज्यातील आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २०२३-२४ पासून ५०टक्के अनुदानावर द्राक्ष पिकासाठी प्लास्टिक कव्हर या घटकाची अंमलबजावणी करण्यात येते.

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राचे पंचनामे करुन बाधित क्षेत्राकरीता महसुल विभागामार्फत निधी मंजुर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील निमजी येथील संयुक्त वन व्यवस्थापन समितीने केलेला गैरव्यवहार

**(८) * ३०७५५ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमेश्वर (जि. नागपूर) तालुक्यातील निमजी येथील संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या कारभारात आर्थिक गैरव्यवहार झाल्याने समिती बरखास्त करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन समाज कल्याण फाउंडेशनने मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य व वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त संयुक्त वनव्यवस्थापन समिती बरखास्त करून गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे अंशतः खरे आहे.

वंचित बहुजन कल्याण फाऊंडेशन, नागपूर यांचे वतीने श्री. विजय अर्जुनदास राठोड, रा. लॉगोस्टीक पार्क समोर, निमजी (खदान), ता. कळमेश्वर, जि. नागपूर यांनी समितीच्या अशासकीय खात्याशी (समिती खाते) संबंधीत तक्रार केलेली आहे.

महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ५ ऑक्टोबर, २०११ अन्वये संयुक्त वन व्यवस्थापन समिती, निमजी यांचे दोन खाते क्रमांक असुन एक "शासकिय खाते" तसेच दुसरे "समिती खाते" आहे. समिती खात्याचे संचालन अध्यक्ष व कोषाध्यक्ष यांचेद्वारे करण्यात येते. तक्रार ही "समिती खाते" यांचेशी संबंधित असून वन विभागाचा यात कोणताही संबंध नाही. सदरहू खात्यातील निधीच्या विनीयोगास त्यांच्या कार्यकारीच्या ठरावाप्रमाणे ग्रामपंचायतीच्या आमसभेअंतर्गत मंजूरी घेण्यात आलेली आहे.

(२) सदर खाते हे समितीचे "समिती खाते" असल्यामुळे वन विभागा मार्फत चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापी वंचित बहुजन कल्याण फाऊंडेशन नागपूर याचे कडून प्राप्त "समिती खाते" च्या तक्रारीच्या अनुषंगाने क्षेत्र सहाय्यक कळमेश्वर यांनी चौकशी केली असता चौकशीअंती समिती व्दारे करण्यात आलेली कामे पूर्ण झाल्याचे निदर्शनास आले. क्षेत्र सहाय्यक कळमेश्वर यांनी समितीचे कोषाध्यक्ष व अध्यक्ष यांचे नोंदविलेल्या बयाणानुसार कोषाध्यक्ष व अध्यक्ष यांनी सदर पदावर न राहण्याची इच्छा दर्शविलेली आहे.

त्या अनुरोधाने संयुक्त वनव्यवस्थापन समिती निमजीचा कार्यभार सुरळीत चालण्याच्या उद्देशाने विद्यमान संयुक्त वनव्यवस्थापन समिती निमजी बरखास्त करुन नविन समिती तयार करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी समाजाची जात पडताळणी प्रक्रिया व तद्‌संबंधिचे नियम अद्ययावत करण्याबाबत

**(९) * ३२२३५ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी समाजाला शासकीय, निमशासकीय, अशासकीय लाभ घेण्यासाठी जात पडताळणी करून घ्यावी लागते तथापि सदर प्रक्रिया व त्याचे नियम अद्ययावत करण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रक्रिया अत्यंत किचकट व वेळ घेणारी असल्याने खरे आदिवासी पुराव्यांच्या अभावी विविध लाभांपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रक्रियेतील पळवाटांचा गैरफायदा घेऊन मोठ्या प्रमाणात बिगर आदिवासींनी आदिवासी जात प्रमाणपत्रे मिळविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त समाजाच्या जात पडताळणीची प्रक्रिया व त्याचे जुने व कालबाह्य नियम अद्ययावत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२), (३) व (४) अधिनियम, २००० व नियम, २००३ मध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना चुकीच्या खत वापरामुळे झालेल्या पीक नुकसानीची भरपाई देण्याबाबत

**(१०) *३०३९९ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या चुकीच्या खत वापरामुळे पिकांचे नुकसान झाले असून त्यामुळे उत्पादन घटले आहे, शेतकऱ्यांनी खतावर हजारो रुपये खर्च करुनही शेतीत अपेक्षित उत्पन्न मिळाले नसल्याने उलट कर्जबाजारीपणा वाढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाकडून योग्य मार्गदर्शन आणि खतांची गुणवत्ता तपासणी न होणे, खत विक्रेत्यांकडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने गत वर्षी देखील शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांना चुकीच्या खत वापरामुळे झालेल्या पिक नुकसानीची नुकसान भरपाई तात्काळ अदा करण्याबाबत तसेच पिक उत्पादन वाढवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) बुलढाणा जिल्ह्यात सन २०२५-२६ खरीप व रब्बी हंगाम मध्ये एकुण रासायनिक खत साठा २,८७,६१३ मे. टन उपलब्ध होता. त्यापैकी २,२३,५३९ मे. टन रासायनिक खत साठा विक्री करुन उर्वरीत ६४,०७४ मे. टन रासायनिक खत साठा फेब्रुवारी २०२६अखेर उपलब्ध आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यामध्ये मौजे गोद्री येथील ६ शेतकऱ्यांनी मे. जैन बायोटेक ॲण्ड रिसर्च, ममुराबाद, जळगाव येथुन कंपनी प्रतिनिधीच्या मध्यस्थीने जिल्ह्याबाहेरून सुक्ष्म मुलद्रव्ये व इतर खते खरेदी केले होते. सदर खताचा वापर केल्यामुळे संबंधीत शेतकऱ्यांना पिकाच्या गुणवत्तेबाबत फरक दिसुन आला नाही.

कृषि विभागास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीने प्रत्यक्ष शेताची पाहणी करून पंचनामा केलेला असून, झालेल्या नुकसानीबाबतचा अहवाल देण्यात आलेला असून संबंधित शेतकऱ्यांना मा. जिल्हा ग्राहक न्यायालय, बुलढाणा येथे दाद मागणेस्तव मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

बुलढाणा जिल्ह्यामध्ये रासायनिक खत परवानाधारक विक्रेते २३७५ असुन, २०५७ विक्रेत्यांची निरिक्षकांमार्फत तपासणी केली आहे. एकुण १०५६ खताचे नमुने काढून प्रयोगशाळेमध्ये विश्लेषणाकरीता पाठविण्यात असून त्यापैकी ६१ खत नमुने अप्रमाणित आढळून आले असून त्यांचेविरुद्ध खत नियंत्रण आदेश १९८५ नुसार ३२ विक्रेत्यांचे परवाने निलंबीत व २४ विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आलेले आहे. तसेच विविध १७० प्रकरणात विक्रीबंद आदेश देण्यात आले आहेत.

जिल्ह्यामध्ये सन २०२४-२५ मध्ये १८५०० मृद जमीन आरोग्य पत्रिका वाटप करण्यात आलेल्या असुन, सन २०२५-२६ मध्ये २२६१६ मृद जमीन आरोग्य पत्रिका वाटप करण्यात आलेल्या आहेत. तसेच संतुलीत खत वापर करणेबाबत कृषि विभाग व कृषि विज्ञान केंद्रामार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील राखीव वन क्षेत्रातील सागवान वृक्षांची तोड केल्याबाबत

**(११)** * **२५४७५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यात राखीव वन क्षेत्रातील २६८ सागवान वृक्षांची तोड (कटाई) केल्याने या प्रकरणी सीसीएफ यांनी समितीची नियुक्ती करून सात दिवसाच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी वडगाव जंगल रेंज येथील सहायक व वन संरक्षक यांची चौकशी करण्यासाठी उपवनसंरक्षक (व्हिजलन्स) यांच्या नेतृत्वाखाली चौकशी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२) व (३) यवतमाळ जिल्हयातील वडगांव वनपरिक्षेत्रातील झालेल्या अवैध वृक्षतोडीची चौकशी करण्याकरीता राखीव वन क्षेत्रातील २६८ सागवान वृक्षांची कटाई झाल्याने याप्रकरणात विभागीय वन अधिकारी (दक्षता) यवतमाळ वनवृत्त यांचे अध्यक्षतेखाली ३ सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

चौकशी समितीने संबंधीत सर्व वनकर्मचारी/अधिकारी तसेच तक्रारदार यांना बोलावुन तसेच प्रकरणाशी संबंधित सर्व दस्तऐवजाची पडताळणी करुन दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रा) यवतमाळ यांचेकडे चौकशी अहवाल सादर केला आहे. चौकशी समितीकडून या अवैध वृक्षतोडीस जबाबदार असलेले क्षेत्र सहायक, वडगाव, वनरक्षक, चिचघाट यांना उपवनसंरक्षक यवतमाळ यांनी दिनांक १६ जानेवारी, २०२६ अन्वये निलंबीत करण्यात आले आहे. तसेच सहा. वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा) यवतमाळ व वनक्षेत्रपाल प्रा. वडगांव धा. यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेंतर्गत ग्रामपंचायतींच्या निधी वाटपात झालेला दुजाभाव

**(१२) * २३५६५ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील काही ठराविक ग्रामपंचायतींना ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेंतर्गत निधी मिळत असून उर्वरित ग्रामपंचायतींना निधी मिळत नसल्याने सरपंच संघटना, जव्हार यांनी पारदर्शक निधी वाटपाच्या मागण्यांसंदर्भात जव्हार येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासमोर दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान धरणे आंदोलन व सामुहिक उपोषण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सरपंच संघटनेच्या मागणीनुसार ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत जव्हार आदिवासी प्रकल्प कार्यालयात निधी वाटपात नेहमी दुजाभाव होत असल्याने जनतेची अत्यावश्यक विकास कामे निधी अभावी प्रलंबित असून या योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यासह उक्त तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना समान निधी वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) पालकमंत्री, पालघर जिल्हा यांचेसमवेत सदर संघटनेच्या प्रतिनिधीसोबत दिनांक ४ फेब्रुवारी, २०२६ रोजी बैठक आयोजित करून त्यांच्या प्रश्नांचे समाधान करण्यात आले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) शहराचे माजी नगराध्यक्ष यांनी वन विभागाचा भूखंड भारतीय राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरणाला विक्री केल्याबाबत

**(१३) * ३१६१४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) शहराचे माजी नगराध्यक्ष यांनी वन विभागाचा भूखंड केंद्र शासनाचा उपक्रम

असलेल्या भारतीय राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरणाला विक्री करून शासनाची फसवणूक केली असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वन विभागाचा भूखंड भारतीय राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरणाला विक्री करून शासनाची फसवणूक केली असल्याने याप्रकरणी दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२), व (३) मौजे वहाळ, ता. पनवेल जि. रायगड येथील सर्व्हे क्र. ४३६/१ ब चे १.८४७५ हे.आर क्षेत्रास मानीव राखीव वनाचा दर्जा प्राप्त असताना देखील सदर क्षेत्र सन २०१८ मध्ये राष्ट्रीय महामार्ग क्र.४-ब साठी थेट खरेदीखताव्दारे प्रकल्प संचालक, नॅशनल हायवे ॲथोरीटी इंडिया यांनी श्री.जनार्दन म्हात्रे यांच्याकडून खरेदी केली व त्यापोटी त्यांना रक्कम रु. ४२.४० कोटी इतका मोबदला अदा करण्यात आला असल्याची बाब निदर्शनास आली.

सदर अनधिकृत खरेदी-विक्रीच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही होण्याबाबत उप वनसंरक्षक, अलिबाग यांनी दिनांक १ जानेवारी, २०२४ च्या पत्रान्वये संबंधित प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास कळविले. तसेच दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ रोजी शासकीय वन जमिनीची बेकायदेशीर खरेदी-विक्री बाबतची तक्रार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर यांच्याकडे दाखल केली.

वन विभागाच्या तक्रारीस अनुलक्षून श्री.जनार्दन म्हात्रे व इतर यांच्याविरुध्द दिनांक ४ सप्टेंबर, २०२४ रोजी गुन्हा (FIR) नोंदविण्यात आला आहे. सदर FIR रद्द करण्यासाठी मा.उच्च न्यायालयामध्ये श्री.म्हात्रे यांनी दावा दाखल केला असून तो सुनावणीवर प्रलंबित आहे.

मौजे वहाळ ता. पनवेल, जि. रायगड येथील प्रकरणांत शासनाची दिशाभुल करुन आर्थिक व्यवहारास जबाबदार असलेल्या अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करणे तसेच वन विभागाच्या जमिनीवरील बोजा हटविण्याकरिता शासन निर्णय दिनांक ७ जुलै, २०२५ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचे कामकाज प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यात लिंकिंग प्रणालीद्वारे युरिया खताची खरेदी करताना इतर महागडी खते घेण्याची सक्ती करण्यात येत असल्याबाबत

**(१४) * २७२९७ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात व विशेषतः लातूर, पुणे, नागपूर, नाशिक, सांगली, गडचिरोली, वर्धा जिल्ह्यात शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात युरिया खत खरेदी करताना दुकानदारांकडून इतर खते सुफला, फवारणी औषधे, जैविक औषधे, कीटकनाशके घेणे बंधनकारक केले जात असल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनाकडून खत वितरणात पारदर्शकता आणण्यासाठी लिंकिंग प्रणाली सुरू केली असून याच लिंकिंग प्रणालीचा परिणाम शेतकऱ्यांवर होत असून खत कंपन्या आणि विक्रेत्याकडून लिंकिंगच्या नावाने युरिया खत घ्यायचे असेल तर त्यासोबत इतर महागडी संमिश्र खते, औषधे घेण्याची सक्ती किरकोळ विक्रेत्यांवर केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त लिंकिंगच्या अटीमुळे किरकोळ विक्रेते शेतकऱ्यांना महागडी खते खरेदी करण्यास सक्ती करत असून शेतकऱ्यांनी जास्त पैसे न दिल्यास खते देण्यास नकार दिला जात असून याबाबत तक्रार केल्यास गुणनियंत्रण विभागाचे अधिकारी दोषी विक्रेत्यांवर कारवाई करण्याऐवजी केवळ १-२ दिवसांच्या निलंबनाचे सोपस्कार पार पाडून त्यांना अभय देत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार लिंकिंगच्या नावाने सुरू असलेली शेतकऱ्यांची आर्थिक लुट थांबवणे, युरिया खताचा पुरवठा वाढवणे, खताची दर वाढ रद्द करणे त्याचप्रमाणे युरिया खताची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या खत निर्मिती कंपन्या, विक्रेते, किरकोळ विक्रेत्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्याबाबत तसेच कृषी सेवा केंद्रांमधील साठा आणि विक्री यांची पारदर्शक तपासणी करण्यासाठी जिल्हास्तरीय ‘भरारी पथके’ नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) राज्यात खताच्या लिंकींग होत असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्याअनुषंगाने गुणनियंत्रण निरीक्षक व जिल्ह्यास्तरीय भरारी पथकांमार्फत तपासणी करण्यात आली आहे. सदर तपासणीमध्ये अनियमितता आढळल्यास संबंधीत विक्रेत्यांवर खत (नियंत्रण) आदेश, १९८५ व अत्यावश्यक वस्तु कायदा, १९५५ नुसार कारवाई करण्यात येत आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून खतांसाठी लिंकींग प्रणाली सुरु करण्यात आलेली नाही. तसेच खतांच्या लिंकींगबाबत व अनियमिततेबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्याबाबत तपासणी करुन खत नियंत्रण आदेश, १९८५ चे उल्लंघन केल्याबाबत कारवाई केली जाते.

लिंकींग संदर्भात दोषी विक्रेत्यांवर केलेल्या कारवाईबाबत संबंधित जिल्ह्यातील परवाना अधिकारी यांच्या कामकाजाची चौकशी करण्याचे आयुक्त (कृषी) यांना कळविण्यात येत आहे.
(४) राज्यात खत विक्रेते व उत्पादक यांच्याकडील खतांची गुण नियंत्रण निरीक्षकांकडून नियमितपणे तपासणी करण्यात येते. तसेच प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तरीय ४४ भरारी पथके नेमण्यात आली आहे. राज्यात लिंकींग न करण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात येतात.

राज्यामध्ये ५०४०४ खत विक्रेत्यांची व ७३५ खत उत्पादकांची तपासणी करण्यात आली आहे. राज्यात खताचे एकुण १९४५९ नमूने तपासले असून १९७४ नमुने अप्रमाणित आहेत. त्यापैकी १४२२ नमुने कोटकेसपात्र आहेत व त्यावर कायदेशीर कारवाई सुरु आहे. खताचा एकुण २४७०.६७ मे.टन साठा जप्त करण्यात आला असून त्याचे मुल्य ४४९.९२ लाख इतके आहे. राज्यात खताचे ९६७ परवाने निलंबित व ५१० परवाने रद्द केले आहेत. तसेच ६७ पोलीस केसेस दाखल केल्या आहेत.

युरीया खत विक्रीमध्ये होणारे गैरव्यवहार थांबविण्यासाठी क्षेत्रीयस्तरावर माहिती स्वरुपात e-POS प्रणालीवर तपासणी करुन ५३४ कृषी सेवा केंद्राचे परवाने निलंबित करण्यात आले असून ६१ कृषी सेवा केंद्राचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये खत (नियंत्रण) आदेश, १९८५ मधील तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे तसेच खताचा पुरवठा करताना अनियमितता केल्या कारणामुळे बल्लारशहा, जि. चंद्रपूर येथे गुन्हा क्र. ४७३ दाखल केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील सीना नदीकाठावरील नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेले बहु-भूधारक शेतकरी मदतीपासून वंचित राहिल्याबाबत

**(१५) * ३१९४१ श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सीना नदीकाठावरील एकूण ३०७२.५ हेक्टर क्षेत्र नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झाले असून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसानभरपाईकरिता एकरी रु. ४७,०००/- प्रमाणे अनुदान वितरित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नदीकाठावरील बाधित क्षेत्रामध्ये ७१२ बहु-भूधारक शेतकरी यांचे एकूण ४९०.८९ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असतानाही त्यांना मदत मिळाली नाही, तसेच बहु-भूधारक शेतकऱ्यांना केवळ जमीनधारणा अटीमुळे मदतीपासून वंचित ठेवण्यात आल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या सर्व शेतकऱ्यांना जमीनधारणा निकष शिथिल करून मदत देण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने बहु-भूधारक शेतकऱ्यांसाठी विशेष तरतूद व नियम शिथिल करून अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) सोलापूर जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर, २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेतजमिनीचे नुकसान झालेप्रकरणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे पंचनामे पूर्ण करण्यात आले असून मदत वाटपाची पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटरमध्ये सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१६) * ३१८०१ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयात १४० कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर मधील बहुतांश विभाग अद्याप कार्यान्वित झाले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक निधी मोठ्या प्रमाणावर खर्च करूनही, सदर वास्तूत केवळ सभागृह आणि वाचनालय सुरू असून, नियोजित बँक, उपहारगृह (Canteen) आणि अन्य व्यावसायिक गाळे अद्यापही बंद आहेत तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ४० फूट उंच पुतळा देखील उभारण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त व संबंधित अधिकाऱ्यांकडून उक्त सुविधा सुरू करण्याबाबत दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त केंद्राच्या देखभालीसह विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर वास्तू पूर्ण क्षमतेने सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१), (२), (३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे.
नागपूर येथे शासनाने १४० कोटी रुपये खर्चुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर उभारले आहे. सदरच्या केंद्रात सद्यस्थितीत अभ्यासिका, ऑडीटोरीअम हॉल, बैंक्वेट हॉल, कॉन्फरन्स हॉल, ट्रेनिंग हॉल, डॉरमेटरी, गेस्ट रुम, मिनी कॉन्फरन्स हॉल इत्यादी विभाग पुर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. याबाबत नागरिकांमध्ये कोणताही रोष नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या निर्माणाधीन पुतळयाचे काम ७५ टक्के पूर्ण झाले असून; पुढील दोन महिन्यात सदर काम पूर्णत्वास येईल.

बँकेची जागा आणि व्यावसायिक गाळे भाडेतत्वावर देण्यासाठी वर्तमानपत्रात प्रेसनोटद्वारे तसेच पत्राद्वारे एकूण १७ बँकांकडून अर्ज मागविण्यात आले होते, परंतु त्यास प्रतिसाद प्राप्त झाला नसल्याने; केंद्रातील बँकेची जागा, उपहारगृह, व्यावसायिक गाळे भाडेतत्वावर देण्यासंबंधी नव्याने कार्यवाही प्रस्तावित आहे.

केंद्राच्या देखभालीसाठी शासनाने सन २०२३-२४ मध्ये आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली होती. त्यानंतर अभ्यासिका, ऑडीटोरीअम हॉल, बैंक्वेट हॉल, कॉन्फरन्स हॉल, ट्रेनिंग हॉल, डॉरमेटरी, गेस्ट रुम, मिनी कॉन्फरन्स हॉल मधून प्राप्त भाडेरकमेतून देखभालीचा व शासनाकडून वीज बिल देयकाचा खर्च भागविण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गंगाखेड (जि.परभणी) येथील शेतकऱ्यांच्या शेती पिकांच्या नुकसानीपोटी मिळणा-या नुकसान भरपाईत वाढ करण्याबाबत**

**(१७) * ३१६६७ श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगाखेड (जि.परभणी) येथील बालाघाटच्या डोंगर भागात वन्यप्राण्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात अनेक शेतकरी गंभीर जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्यप्राण्यांच्या हल्यामुळे होणा-या जीवितहानी, पशुधन आणि पिकांची नुकसान भरपाईसाठी शेतक-यांना हल्ल्याबाबतची माहिती तीन दिवसाच्या आत शासनाकडे ऑनलाईन पध्दतीने भरुन देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतक-यावर वन्यप्राण्याने हल्ला केल्यानंतर जखमी शेतकऱ्यांना उपचाराकरीता दवाखान्यात दाखल करून त्याच्यावर उपचार होणे गरजेचे असल्याने उक्त अटीमुळे शेतकऱ्यांना शासनाच्या नुकसान भरपाईपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, वन्यप्राण्याच्या हल्ल्यात नुकसान झालेल्या शेती पिकांना प्रती गुंठा केवळ २५० ते ४०० रुपयांपर्यत नुकनास भरपाई अदा करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वन्यप्राण्याच्या हल्ल्याची माहिती ऑनलाईन भरण्यासाठी असलेली तीन दिवसाची मुदत वाढवून ती किमान ३०दिवस करण्याबाबत तसेच शेतीपिकांच्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या नुकसान भरपाईमध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) मागील ४ वर्षात परभणी जिल्ह्याच्या गंगाखेड तालुक्यात २ व्यक्तींवर वन्यप्राण्याने हल्ला केल्याच्या घटना तसेच मागील चार वर्षात एकूण ९३ पीक नुकसानी प्रकरणे निदर्शनास आली असून, त्यांना ५,२६,२८३ रु. नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ चे नियम ८ अंतर्गत केलेल्या नियमामध्ये पुढीलप्रमाणे तरतुदी केल्या आहेत.

(१) नियम ५ (१) (क) वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे मानवी जीवितहानी झाल्याबद्दलची सूचना, कोणत्याही व्यक्तीद्वारे, तात्काळ जवळच्या वनरक्षकाला लेखी स्वरुपात देण्यात येईल.

(२) नियम ५ (१) (ख) अशा प्रकरणी, अधिनियमान्वये प्रदेय असलेल्या नुकसान भरपाईसाठी मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसांद्वारे अशा घटनेपासून अठेचाळीस तासांच्या आत संबंधित वन क्षेत्रपालाकडे नमुना- एकमध्ये मध्ये अर्ज करण्यात येईल.

(३) नियम ८ (१) पिकांचे किंवा फळझाडांचे नुकसान झाल्यास, मालक या अधिनियमान्वये प्रदेय असलेली नुकसान भरपाई मिळण्यासाठी जेथे असा हल्ला झाला असेल त्या क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या संबंधित वनक्षेत्रपालाकडे बहात्तर तासांच्या आत नमुना-तीनमध्ये अर्ज करील.

वन्यप्राणी नुकसान भरपाई मिळणे ही एक सेवा असल्याचे, सेवा हमी कायदा २०१५ मध्ये अंतर्भूत असल्याने सदर अर्ज ऑनलाईन पध्दतीने विहित कालावधीमध्ये सादर करणे आवश्यक आहे.

(३) (४) व (५) महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ च्या अंतर्गत केलेल्या नियम पोटकलम ३ च्या पोटकलम (३) अन्वये उक्त अधिनियमान्वये झालेल्या पिक नुकसान भरपाईचे दन विनिर्दिष्ठ करण्यात आले आहे. त्यानुसार पिक नुकसान भरपाई दिली जाते.

रानडुक्कर, हरिण, रानगवा, नीलगाय, माकड, वानर किंवा हत्ती यांच्या हल्ल्यामुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीकरिता प्रदेय असलेल्या नुकसान भरपाईचा दर पुढीलप्रमाणे आहे.

| नुकसानीचा तपशील | नुकसान भरपाईचा दर |
|---|---|
| शेतपिकाचे नुकसान | पुर्ण किंमत परंतु किमान रु.२००० |
| शेतपिकाचे नुकसान रु.२०,००० पेक्षा जास्त झाल्यास | रु.२,००० अधिक<br>रु.२०,००० चे वरील नुकसानीचे ८०% रक्कम (रु.५०,००० चे कमाल मर्यादेत) |
| ऊस पिकाचे नुकसान | रु.१,६०० प्रती मे. टन प्रमाणे<br>(रु.५०,००० चे मर्यादेत) |

उपरोक्त दराप्रमाणे संबंधितांना नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मौजे मोरया चिंचोरे (ता.नेवासा जि.अहिल्यानगर) येथील महादेव मंदिराची जागा एका खाजगी शिक्षण संस्थेने बळकावल्याबाबत

**(१८) * २९२०२ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोरया चिंचोरे (ता.नेवासा, जि.अहिल्यानगर) गावातील महादेव मंदिराची वर्ग ३ ची ४९ हेक्टर १५ आर जमीन एका खाजगी शिक्षण संस्थेने प्रशासनाच्या मदतीने बेकायदेशीरपणे संस्थेच्या नावावर केल्यामुळे याबाबत महसूल मंत्री यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम (२९) क नुसार भोगवटादार वर्ग ३ ची जमीन शासनाच्या मालकीची असून सदरहू जमीन ही केंद्र शासनाच्या शासकीय अनुदान कायदा, १९६५ च्या तरतुदीनुसार राज्य शासनाला हस्तांतरीत करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमीन ही शासकीय अधिकारी व संस्थेचे अध्यक्ष यांनी गैरव्यवहार करुन संस्थेच्या मालकीची केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम-२९ मध्ये जमीन धारण करणा-या व्यक्तींचे वर्ग (अ) भोगवटादार वर्ग-एक (ब) भोगवटादार वर्ग-दोन व (क) सरकारी पट्टेदार असे असतील असे नमूद केले आहे.

प्रस्तुत देवस्थान इनाम जमीनीस तत्कालीन प्रांत अधिकारी यांचेकडील आदेश दिनांक १८/०५/१९३२ अन्वये भर आकार बसवलेबाबतची नोंद फेरफार क्रमांक २६३ अन्वये घेण्यात आलेली आहे. शासकीय अनुदान अधिनियमानुसार मालमत्ता हस्तांतरण कायदा, १८८२ चे विवरण देण्यात आलेले आहे. या कायद्यात केंद्र शासनाला कोणत्याही अनुदानावर अटी व शर्ती लागू करण्याचे अधिकार असल्याचे नमुद केलेले आहे.
जोगळेकर इनाम मॅन्युअल १९२१ चे परिच्छेद क्रमांक ६६ मध्ये "Resumption by the levy of full assessment from the Resumption, existing holder should be ordered when
(a) the profits of the Inam land have been diverted from the institution concerned;
(b) the institution itself has ceased to exist, or to be used as such" असे नमुद केलेले आहे.
त्यानुसार प्रस्तुतच्या जमीनीस भर आकार बसविलेबाबतची नोंद फेरफार क्रमांक २६३ ने घेणेत आली आहे. सदर फेरफाराचा अंमल फेरफार क्रमांक- १९२६ अन्वये या जमीनीचे ७/१२ उता-यावरील देवस्थान इनाम वर्ग-३ हा शेरा कमी करण्याची नोंद घेण्यात आलेली आहे. तदनंतर झालेल्या खरेदी व्यवहारांची नोंद फेरफार क्रमांक १९४२ व २४७० ने घेणेत आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मावळ (जि.पुणे) तालुक्यातील नागरीकांना कुणबी प्रमाणपत्र मिळणेबाबत

**(१९) * ३१७०६ श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील अनेक गावांतील नागरिकांनी कुणबी प्रमाणपत्रासाठी तहसिल कार्यालयात अर्ज दाखल केले असून नागरिकांना तहसिल कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुका प्रशासनाकडून गावनिहाय कुणबी याद्या प्रसिध्द करण्याचे आश्वासन देऊनही सईली नागरी सुविधा केंद्रात दाखले प्रलंबित असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भूमि अभिलेख कार्यालयात उपलब्ध असलेल्या जुन्या दस्तऐवजांवर आधारित वंशावळ प्रक्रिया पूर्ण न झाल्यास कुणबी प्रमाणपत्र मिळणे अडचणीचे झाल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) कुणबी प्रमाणपत्राच्या संदर्भात अखंड मराठा समाज, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा यांच्यावतीने दि१९ सप्टेंबर, २०२५ व दि.९.१२.२०२५ रोजी तहसीलदार, मावळ यांना निवेदन प्राप्त झाले. सदर निवेदनातील मागण्यांच्या अनुषंगाने अखंड मराठा समाजाचे प्रतिनिधींसमवेत सर्व संबंधित अधिकारी यांची दि.२६.९.२०२५ रोजी तहसीलदार, मावळ यांच्यांकडे बैठक घेण्यात आली. त्यानुसार मोडी भाषेतील दस्तऐवजांचा मराठी भाषेमध्ये रुपांतरीत करुन मराठी भाषेतील याद्या सर्व संबंधित गावांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

तसेच मावळ तालुक्यामध्ये कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीच्या नोंदी ग्राम स्तरावर प्रसिध्द करण्यात आल्या असून सदरच्या नोंदी एनआयसी (NIC) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.२५.१.२०२४ च्या शासन निर्णयानुसार तालुका स्तरावर कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासंदर्भात वंशावळ जुळविण्यासाठी दि.१२.७.२०२४ रोजी तहसीलदार, मावळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

मावळ तालुक्यामध्ये माहे ऑक्टोबर, २०२३ पासून एकूण १३८७ जात दाखले मंजूर करण्यात आले असून ९ जातीचे दाखले नामंजूर करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दुर्वेस ( ता.जि.पालघर) गावात मियावाकी जंगल उभारणीच्या नावाने वृक्षतोड होत असल्याबाबत

**(२०)** * **३१६८६ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे. दुर्वेस (ता.जि.पालघर) या गावात मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ लगत असलेल्या राखीव वन क्षेत्रात सावर, साग, करवन, पलस, जांभूळ अशा स्थानिक प्रजातीची एक लाखांपेक्षा जास्त वृक्ष तोडण्यात आले असून मियावाकी जंगल उभारणीच्या नावाने लाखो वृक्षाची वृक्ष तोड झाल्याचे स्थानिक आदिवासी ग्रामस्थांनी माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाने मियावाकी जंगलासाठी ४४ हजार झाडे लावण्यासाठी लाखो वृक्षांची वृक्ष तोड झाल्याने जंगलात श्वापदांचा वावर असताना मोठी वृक्षतोड करण्यात आली असून संयुक्त वन व्यवस्थापन समितीला न विचारता निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गावातील आदिवासी बांधवांनी वर्षानुवर्षे जपलेले जंगल एका खासगी प्लॉटला सुविधा देण्यासाठी हटवले जात असल्याचा आरोप स्थानिक आदिवासींनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासह वृक्षतोडीस प्रतिबंध करून राखीव वनाचे संवर्धन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

डहाणू वन विभागातील दहिसर वनपरिक्षेत्रांतर्गत मौजे दुर्वेश मध्ये २.००हेक्टर क्षेत्रात ओसाड जमिनीवर पुर्नवनीकरण करणे (अटल घन वन योजना) या योजनेअंतर्गत योजनेअंतर्गत ६०००० रोपे नव्याने लागवड करण्यात येणार आहे. या क्षेत्रावर वृक्षतोड झालेली नाही. या क्षेत्रातील लहान खुरटी झुडपे व गवत इ. ची साफसफाई करुन, रोपवनाचे पुर्वपावसाळी कामे करण्यांत आलेली असून, सन २०२६ च्या पावसाळी हंगामात ६०००० रोपांची लागवड करण्यात येणार आहे.

(२) या क्षेत्रावर ओसाड जमिनीवर पुर्नवनीकरण करणे (अटल घन वन योजना) योजनेअंतर्गत वृक्ष लागवड करून वनक्षेत्रातील वृक्ष आच्छादन वाढविणे हा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे या क्षेत्रावर लाखो वृक्षतोड करण्यात येणार असल्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे संयुक्त वनव्यवस्थापन समितीकडून परवानगी घेण्याचा सुध्दा प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात माजी सैनिकांना मिळालेल्या जमिनीची नोंद 'कब्जेदार' सदरी घेऊन गहाळ झालेली नोंद पूर्ववत करण्याबाबत**

**(२१) * ३२०६६ श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माजी सैनिकांना सेवा काळात किंवा सेवानिवृत्तीनंतर दिलेल्या जमिनींची नोंद हस्तलिखित ७/१२ उताऱ्यावर 'इतर हक्कात' करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील माजी सैनिकांच्या हस्तलिखित ७/१२ उताऱ्यांचे संगणकीकरण (Online) करताना तांत्रिक त्रुटीमुळे अनेक माजी सैनिकांच्या जमिनीची 'इतर हक्कातील' नोंद वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ७/१२ उताऱ्यावर 'कब्जेदार' सदरी नाव नसल्यामुळे माजी सैनिकांना पीक कर्ज, शासकीय योजनांचा लाभ व वारस नोंद करण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ज्या माजी सैनिकांच्या जमिनीची नोंद ऑनलाईन प्रक्रियेत सुटली आहे किंवा इतर हक्कातून कमी झाली आहे, ती नोंद पुन्हा प्रमाणित करून 'कब्जेदार' सदरी घेण्यासाठी महसूल विभागाने जिल्हा स्तरावर निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त तांत्रिक चुका दुरुस्त करून ७/१२ उताऱ्यावर माजी सैनिकांचे नाव 'कब्जेदार' म्हणून लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४) व (५) माजी सैनिकांना सेवा काळात किंवा सेवानिवृत्तीनंतर दिलेल्या जमिनींची नोंद ७/१२ उताऱ्यावर कब्जेदार सदरी घेण्यात येते.

हस्तलिखित ७/१२ चे संगणकीकरण करताना नाव व क्षेत्राबाबत लेखन प्रमाद झाल्यास महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ मधील नियम १५५ अन्वये दुरूस्ती करण्याची तरतूद आहे. सदर दुरुस्ती तहसिलदार यांच्या आदेशाने ग्राम महसुल अधिकारी करतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळकोट (जि.लातूर) तालुक्यात 'वन परिक्षेत्र अधिकारी' कार्यालय स्थापन करण्याबाबत**

**(२२) * ३१८२२ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्याची निर्मिती होऊन २७ वर्षे झाली तरी अद्याप 'वन परिक्षेत्र अधिकारी' कार्यालय सुरू करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळकोट तालुक्यातील नागरिकांना साध्या कामांसाठी ४० कि.मी.चा प्रवास करून उदगीर किंवा अहमदपूरला जावे लागत असून त्यामुळे त्यांच्या वेळेचा व पैशाचा अपव्यय होत असल्याने गत २७ वर्षांत सदर कार्यालयासाठी अनेक वेळा प्रस्ताव पाठवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन विभागाच्या स्थानिक नियंत्रणाअभावी दररोज शेकडो टन लाकूड अवैध मार्गाने तालुक्याबाहेर जात असल्याने अवैध वृक्षतोड करणाऱ्या टोळ्यांवर आळा घालण्यासाठीआणि तालुक्याची वनसंपदा वाचवण्यासाठी व तात्पुरत्या स्वरूपात भरारी पथक किंवा विशेष चौकी स्थापन करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जळकोट तालुक्यात 'वन परिक्षेत्र अधिकारी' कार्यालय स्थापन करून कार्यालयासाठी आवश्यक असणारी पदनिर्मिती (उदा. वनपाल, वनरक्षक) आणि इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे आहे,

छत्रपती संभाजीनगर वनवृत्तातील धाराशिव वन विभागा अंतर्गत धाराशिव व लातूर या दोन जिल्हयाचा समावेश होत असून, लातूर जिल्हयातील जळकोट तालूक्याचे भौगोलिक क्षेत्र ३६१८० हे.आर असून वनक्षेत्र ४१५.१४ हे.आर. आहे. वनक्षेत्राची टक्केवारी १.१४% एवढी आहे. जळकोट तालूका हा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रा. अहमदपूर यांच्या कार्यक्षेत्रात येत असून जळकोट तालूक्यामध्ये वनपाल-०१ व वनरक्षक-०१ यांची पदे मंजूर असून कार्यरत आहेत.
(२) जळकोट तालूकास्तरावर वनपाल-०१ व वनरक्षक-०१ यांचे पदे कार्यरत असून, नागरिकांना आपत्कालीन सेवांसाठी महाराष्ट्र शासनाने १९२६ हा टोल फ्री क्रमांक सुरु केलेला आहे. इतर सेवांसाठी वनविभागाने ऑनलाईन प्रणाली सूरु केलेली असून नागरिकांच्या सेवा व सुविधासाठी १ते १३ सेवा ऑनलाईन देण्याचे अधिसूचीत करून सदर सेवा वनविभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय स्थापन करण्याबाबत प्रस्ताव नाही.
(३) हे खरे नाही,

या विभागा अंतर्गत क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांच्या कडून वेळोवेळी गस्त घालण्याचे काम करण्यात येऊन, अवैध वृक्षतोड व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यात येते. तसेच अवैध वृक्षतोड व वाहतूक निदर्शनास आल्यास वनविभागाकडून वनगुन्हा नोंद करुन दंडात्मक कारवाई करण्यात येऊन वनसंपदा वाचवण्यात येते. वनक्षेत्राचे तुलनेत अधिकारी व कर्मचारी संख्या पुरेशी असून, वेगळयाने तात्पुरत्या स्वरूपात भरारी पथक किंवा विशेष चौकी स्थापन करणेची आवश्यक दिसून येत नाही.
(४) चौकशी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सफाळे-विरार(जि. पालघर) येथील बुलेट ट्रेनच्या पायलिंग कामामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत असल्याबाबत**

**(२३) *३१८५९ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सफाळे-विरार दरम्यानच्या नारिंगी जुली (जि. पालघर) बेटावर एका बाजूला खारभूमी विकास विभागामार्फत खारलैंड बंधाऱ्याचे काम सुरू असताना, दुसऱ्या बाजूला बुलेट ट्रेनच्या पायलिंग कामामुळे शेकडो शेतकऱ्यांचे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन महिन्यांपासून या बंधाऱ्याचे काम सुरू असून त्याच परिसरात सुरू असलेल्या बुलेट ट्रेनच्या पायलिंग कामातून बाहेर पडणारे खारे पाणी थेट भात शेतीत पंपाने सोडले जात असल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिसरातील सुमारे १०० एकर क्षेत्र खाऱ्या पाण्याखाली गेले असून शेतकऱ्यांनी स्वतःच्या खर्चाने एक ट्रॅक्टर पंप आणि दोन डिझेल पंप लावून पाणी बाहेर काढण्याचा प्रयत्न करूनही गत तीन महिन्यांपासून पाण्याचा निचरा होत नसल्याने शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच याप्रकरणी प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नसल्याने बाधित शेतक-यांना अद्याप कोणतीही नुकसानभरपाई देण्यात आली नाही त्यामुळे शेतक-यांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

वसई तालुक्यातील मौजे नारिंगी या गावात ज्युली बेट आहे. सदर बेटाचे क्षेत्र ९८ हेक्टर असून त्यापैकी साधारणत: ७५ हेक्टर क्षेत्रावर भातपिकाची लागवड केली जाते. सदर बेटाचे क्षेत्रावर मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे (बुलेट ट्रेन) या प्रकल्पाची सरेखा जात आहे. तसेच, याठिकाणी जुली खारभुमी योजनेच्या बांधाच्या नुतनीकरणाचे काम माहे नोव्हेंबर, २०२५ पासून सुरु करण्यात आले आहे.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम NHSRCL (National High Speed Rail Corporation Ltd.) मार्फत करण्यात येत आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या पायलिंगचे काम सुरु असताना काही प्रमाणात पाणी साठलेले होते. बुलेट ट्रेन प्रकल्पाचे अधिकारी यांनी सदर ठिकाणी स्थानिक शेतकऱ्यांशी चर्चा करुन प्रकल्पाच्या ROW च्या समांतर लांब पाईपलाईन टाकून पाणी खाडीच्या दिशेने टाकण्याची व्यवस्था केलेली आहे.

तसेच, बुलेट ट्रेनच्या पायलिंग कामातून बाहेर पडणाऱ्या पाण्याच्या संदर्भात कार्यकारी अभियंता, खारभुमी विकास विभाग, ठाणे व बुलेट ट्रेन प्रकल्पाशी संबंधित अधिकारी यांनी दिनांक १६.०२.२०२६ रोजी संयुक्त पाहणी केलेली असून, त्यादरम्यान सदर पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने करण्याबाबत तसेच, सदर काम करताना शेतीचे नुकसान होऊ नये, याबाबतीत दक्षता घेण्यासाठी संबंधिताना कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी, पालघर यांना देखील अवगत करण्यात आले आहे.
(४) व (५) हे खरे नाही.

शेतजमिनीचे नुकसान झाल्याची कोणतीही तक्रार जिल्हा प्रशासनाकडे तसेच, NHSRCL कडे प्राप्त झालेली नाही. त्याठिकाणी भातशेतीचे नुकसान झाल्याचेही आढळून आलेले नाही. सबब, त्याबाबत नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.